दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २८६ । गुरुवार १३ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# डीएसपी चौकात काळ्या काचांच्या ५६ वाहनांवर कारवाई, १५२ गुन्हे

## शहर वाहतूक शाखेची विशेष मोहीम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी आणि गुन्हेगारीवर चाप बसवण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेने आज, गुरुवारी विशेष मोहीम राबवली. या मोहिमेअंतर्गत केंद्रीय मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या १५२ वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, यात बेकायदेशीरपणे काळ्या काचा (ब्लॅक फिल्म) लावून फिरणाऱ्या ५६ चारचाकी वाहनांचा समावेश आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार दुपारी १२ ते २ या वेळेत शहरातील मोक्याच्या ठिकाणी विशेष नाकाबंदी करण्यात आली होती. डीएसपी चौकासह विविध प्रमुख चौकांत पोलीस पथकाने वाहनांची कसून तपासणी केली. यावेळी काळ्या फिल्म लावलेल्या ५६ गाड्यांच्या काचांवरील फिल्म जागीच काढून टाकत चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. एकूण १५२





वाहनांवर दंडात्मक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील आणि त्यांच्या पथकाने केली.

विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत

# राशीन आणि कर्जतमध्ये तिरंगा रॅली

## ‘हर घर तिरंगा’ उपक्रमातून राष्ट्रप्रेमाचा जागर; नागरिक, युवक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर – स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत राशीन व कर्जत येथे भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलींच्या माध्यमातून नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना अधिक दृढ करण्यासोबतच तिरंग्याप्रती सन्मान, राष्ट्राभिमान आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला.

कर्जत तालुक्यातील राशीन येथे सकाळी ९.३० वाजता भव्य तिरंगा पायी रॅली काढण्यात आली. हातात तिरंगा ध्वज घेऊन विद्यार्थी, युवक,



सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले. यावेळी देण्यात आलेल्या देशभक्तीपर घोषणांनी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यानंतर कर्जत शहरात भव्य तिरंगा मोटारसायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये युवक, विद्यार्थी, नागरिक, विविध संस्था व संघटनांचे पदाधिकारी आणि देशप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. तिरंगा ध्वजांनी सजलेल्या मोटारसायकलींसह सहभागी झालेल्या ■ पान ४ वर

# मेंढपाळ –पशुपालकांवरील कारवाई थांबवा

## प्रत्येक जिल्ह्यात चराई क्षेत्र निश्चित करा । खासदार नीलेश लंके मंत्री भूपेंद्र यादव यांच्याकडे मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महाराष्ट्रातील मेंढपाळ, धनगर समाज आणि पारंपरिक पशुपालकांच्या उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, पशुधन चारण्यासाठी जाणाऱ्या गुराख्यांवर वन विभागाकडून करण्यात येणारी दंडात्मक कारवाई तातडीने थांबवावी, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले आहे.

महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुपालनाला महत्त्वाचे स्थान असून, लाखो कुटुंबांचा उदरनिर्वाह मेंढ्या, शेळ्या व इतर पशुधनावर अवलंबून आहे. धनगर व पारंपरिक पशुपालक समाजातील कुटुंबे पिढ्यान्पिढ्या वनक्षेत्रालगतच्या सरकारी पडीक व गायरान जमिनीवर पशुधन चारून उपजीविका करीत



आहेत. मात्र, अलीकडील काळात राज्यातील विविध भागांत वन विभागाच्या स्थानिक अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून पारंपरिक गुराख्यांवर अन्यायकारक कारवाई होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे लंके यांनी पत्रात नमूद केले आहे.

पशु चराईच्या कारणावरून गुराख्यांना अडविणे, त्यांच्याशी गैरवर्तन करणे, महिलांशी अभद्र वर्तन करणे, पशुधन जबरदस्तीने ताब्यात घेणे, मोठा दंड ■ पान ४ वर

# सोशल मीडियावर आक्षेपार्ह कमेंट्स करणाऱ्यांवर तोफखान्यात दोन गुन्हे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सोशल मीडियाचा गैरवापर करून समाजात तेढ निर्माण करणाऱ्या अपप्रवृत्तींवर पोलिसांनी कायद्याचा बडगा उगारला असून, इन्स्टाग्रामवरील एका संवेदनशील पोस्टवर दोन समाजांत वैमनस्य पसरवणारे वक्तव्य करणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाने थेट दोन स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत.

भिंगार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका घटनेबाबत इन्स्टाग्रामवर पोस्ट करण्यात आली होती. त्यावर जाणीवपूर्वक आक्षेपार्ह कमेंट्स करून ■ पान ४ वर

### तेढ निर्माण केल्यास कडक कारवाई

**सोशल मीडियावर कोणत्याही धर्माच्या किंवा जातीच्या भावना दुखावतील, तसेच तेढ निर्माण होईल अशा पोस्ट किंवा कमेंट्स करू नयेत; अन्यथा कडक कायदेशीर कारवाई केली जाईल.**

बालाजी वैद्य
(पोलीस निरीक्षक, तोफखाना पोलीस ठाणे)

# एक वर्षासाठी हद्दपार केलेला सराईत आरोपी गावठी कट्ट्यासह जेरबंद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जिल्हयात गंभीर गुन्हे आणि सराईत गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार १२ ऑगस्ट रोजी रात्री जिल्ह्यात विशेष ‘कोम्बिंग ऑपरेशन’ राबवण्यात आले. या कारवाईदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जामखेड हद्दीत एका हद्दपार सराईत आरोपीला गावठी कट्ट्यासह अटक केली.

गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने जामखेड ते श्रीगोंदा रोडवरील ‘हॉटेल गंगाई’जवळ सापळा रचून सागर बाळू लोखंडे (वय २६, रा. आरोळेवस्ती, जामखेड) यास ताब्यात घेतले. आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे ५१ हजार रुपये किमतीची एक गावठी कट्टा, एक मॅगझीन आणि एक जिवंत काडतूस असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस तपासात आरोपी सागर लोखंडे याने



हा गावठी कट्टा विक्रीसाठी गणेश दादासाहेब भवर (रा. कळसपिंप्री, ता. पाथर्डी) याच्याकडून आणल्याचे कबूल केले. आरोपी सागर हा पोलीस अभिलेखावर एक वर्षासाठी हद्दपार असून, हद्दपारीचा कालावधी ■ पान ४ वर

# बिबट्याच्या संकटासोबत भटक्या कुत्र्यांचेही संकट; नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

## लहान मुलांसह शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण; भटक्या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी

**अहिल्यानगर** – ग्रामीण भागात बिबट्याच्या वावरामुळे नागरिकांमध्ये आधीच भीतीचे वातावरण निर्माण झाले असताना आता गावोगावी वाढलेल्या भटक्या आणि मोकाट कुत्र्यांच्या संख्येमुळे नागरिकांसमोर दुहेरी संकट उभे ठाकले आहे. विशेषतः लहान मुले, महिला, वृद्ध नागरिक, दुचाकीस्वार तसेच शेतात ये–जा करणारे शेतकरी यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यातील ग्रामीण भागात अनेक ठिकाणी मोकाट कुत्र्यांचे कळप फिरताना दिसत असून, प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. गावातील रस्ते, शाळा परिसर, अंगणवाडी, बाजारपेठ, वसाहती, कचरा साठविण्याची ठिकाणे तसेच शेतरस्त्यांवर भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला आहे. सकाळी शाळेत जाणारी मुले, सायंकाळी खेळण्यासाठी घराबाहेर पडणारी बालके आणि रात्रीच्या वेळी ये–जा करणारे नागरिक यांच्यामध्ये कुत्र्यांच्या हल्ल्याची भीती निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी मोकाट कुत्रे दुचाकीस्वारांच्या मागे धावत असल्याने अपघात होण्याचा धोकाही वाढला आहे.



**प्रा. केशव कातोरे**
दैनिक आकर्षण
मुख्य उपसंपादक दक्षिण
९४०३९४३७९५

### ‘मुले सुरक्षित आहेत का?’ पालकांचा सवाल

शाळा, अंगणवाडी आणि वस्ती परिसरात भटक्या कुत्र्यांचा वाढता वावर पाहता पालकांच्या चिंतेत भर पडली आहे. बिबट्याचे संकट आणि भटक्या कुत्र्यांचे संकट अशा दोन्ही धोक्यांमध्ये लहान मुलांनी सुरक्षितपणे वावरायचे तरी कसे? असा सवाल पालकांकडून उपस्थित केला जात आहे. विशेषतः सकाळच्या आणि सायंकाळच्या वेळेत शाळा परिसरात तसेच वसाहतींमध्ये मोकाट कुत्र्यांची संख्या अधिक दिसून येत असल्याने संबंधित यंत्रणांनी अशा संवेदनशील ठिकाणांची पाहणी करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

### जैवविविधतेच्या दृष्टीनेही गंभीर प्रश्न

भटक्या किंवा मोकाट कुत्र्यांचा प्रश्न केवळ मानवी सुरक्षेपुरता मर्यादित नसून त्याचा पर्यावरणीय परिणामही विचारात घेणे आवश्यक आहे. कुत्र्यांची संख्या एखाद्या परिसरात प्रमाणाबाहेर वाढल्यास ते उपलब्ध अन्नस्रोतांवर मोठा दबाव निर्माण करू शकतात. वन्यजीवांचा पाठलाग, लहान वन्यप्राण्यांवर हल्ले तसेच रोगांचा प्रसार यामुळे स्थानिक जैवविविधतेवर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे मोकाट कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवताना प्राणी कल्याण, सार्वजनिक आरोग्य, मानवी सुरक्षितता आणि जैवविविधता या सर्व बाबींचा समतोल साधणारे धोरण आवश्यक आहे. स्थानिक प्रशासनासह राज्य शासनानेही या प्रश्नाकडे केवळ तात्पुरती समस्या म्हणून न पाहता दीर्घकालीन नियोजन करणे गरजेचे आहे.

### प्रशासनाने ठोस आणि कायमस्वरूपी उपाय करावेत

भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या आणि नागरिकांवरील हल्ल्यांच्या घटना लक्षात घेता स्थानिक स्वराज्य संस्थांनी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण, आवश्यक तेथे पकडण्याची आणि व्यवस्थापनाची शास्त्रोक्त व्यवस्था, सार्वजनिक ठिकाणी अन्नकचरा साचणार नाही यासाठी प्रभावी कचरा व्यवस्थापन तसेच शाळा व अंगणवाडी परिसरात विशेष उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.नागरिकांनीही मोकाट कुत्र्यांना उघड्यावर अन्न टाकणे टाळावे, कचरा रस्त्यावर न टाकता योग्य पद्धतीने त्याची विल्हेवाट लावावी आणि हल्ल्याच्या घटना घडल्यास संबंधित प्रशासनाला तातडीने माहिती द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### गजबजलेल्या वस्तीत चिमुकल्यावर कुत्र्याचा हल्ला

अहिल्यानगर शहरातील एका गजबजलेल्या वस्तीत भटक्या कुत्र्याने एका लहान मुलावर बेफामपणे हल्ला केल्याची घटना समोर आली. कुत्र्याने चिमुकल्याला लक्ष्य केल्यानंतर त्याची आई वेळेत घटनास्थळी पोहोचली. मुलाला वाचविण्यासाठी तिने स्वतःच्या जीवाची पर्वा न करता कुत्र्याचा प्रतिकार केला. आईच्या धाडसी हस्तक्षेपामुळे कुत्र्याने मुलाला सोडून तेथून पळ काढला आणि पुढील अनर्थ टळला. या घटनेमुळे परिसरातील पालकांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे. लहान मुले घराबाहेर खेळण्यासाठी किंवा शाळेत जाण्यासाठी सुरक्षित आहेत का, असा प्रश्न आता पालकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरातील गजबजलेल्या वस्त्यांमध्येही अशा प्रकारे मोकाट कुत्र्यांचा वावर असेल तर ग्रामीण भागातील परिस्थिती किती गंभीर असेल, याची कल्पना या घटनेवरून येते.

### शहरापासून ग्रामीण भागापर्यंत नागरिक त्रस्त

अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यातील विविध गावांमध्ये आणि तालुक्यांच्या ठिकाणी भटक्या कुत्र्यांची संख्या वाढल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. कचरा व्यवस्थापनातील त्रुटी, उघड्यावर टाकला जाणारा अन्नकचरा आणि कुत्र्यांसाठी सहज उपलब्ध होणारे खाद्य यामुळे काही भागांमध्ये मोकाट कुत्र्यांचे कळप वाढताना दिसत आहेत. दिवसा रस्त्यांवर आणि वस्त्यांमध्ये फिरणारे हे कुत्रे रात्रीच्या वेळी अधिक आक्रमक होत असल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून होत आहेत. त्यामुळे रात्री शेतात जाणारे शेतकरी, दूध व्यावसायिक, कामानिमित्त बाहेर पडणारे नागरिक आणि दुचाकीस्वार यांच्यामध्ये भीतीचे वातावरण आहे.

### कुत्र्यांच्या चाव्यामुळे रेबीजचा धोका

भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्याचा सर्वात गंभीर धोका म्हणजे कुत्र्याच्या चाव्यामुळे होणारे संसर्गजन्य आजार, विशेषतः रेबीज. रेबीज हा गंभीर आणि जीवघेणा आजार असल्याने कुत्र्याने चावा घेतल्यास जखमेकडे दुर्लक्ष न करता तातडीने वैद्यकीय सल्ला आणि आवश्यक प्रतिबंधात्मक उपचार घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे केवळ कुत्र्यांना पकडणे हा या समस्येचा कायमस्वरूपी उपाय नसून, निर्बीजीकरण, लसीकरण, योग्य देखरेख, कचरा व्यवस्थापन आणि नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही अशा सर्वंकष उपाययोजनांची आवश्यकता आहे.

### शेतकऱ्यांसमोरही दुहेरी संकट

शेतकरी वर्गासाठी परिस्थिती आणखी चिंताजनक आहे. एका बाजूला शेत परिसरात बिबट्याच्या वावराची भीती, तर दुसऱ्या बाजूला शेतरस्त्यांवर व वस्त्यांमध्ये फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांचे कळप, अशा दुहेरी संकटाला शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. रात्रीच्या वेळी शेतावर जाणे, पिकांची पाहणी करणे, विहिरीवरील किंवा पाणीपुरवठ्याची कामे करणे, जनावरांची देखभाल करणे यासाठी शेतकऱ्यांना घराबाहेर पडावे लागते. अशा वेळी बिबट्याच्या संभाव्य वावरासोबतच मोकाट कुत्र्यांचा धोका निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना वाढत आहे.

### दुहेरी संकटातून नागरिकांची सुटका कधी?

बिबट्याच्या संभाव्य हल्ल्याची भीती आणि भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्याचा वाढता धोका यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांसमोर सुरक्षिततेचे दुहेरी आव्हान उभे राहिले आहे. लहान मुले सुरक्षित नाहीत, शेतकरी सुरक्षित नाहीत आणि सामान्य नागरिकही भयमुक्तपणे वावरू शकत नाहीत, अशी भावना निर्माण होणे ही प्रशासनासाठी गंभीर बाब आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी संभाव्य धोका ओळखून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर तातडीने आणि कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे.

### आईच्या धाडसामुळे चिमुकल्याचा जीव वाचला!

अहिल्यानगर शहरातील गजबजलेल्या वस्तीत भटक्या कुत्र्याने एका लहान मुलावर अचानक हल्ला केला. कुत्र्याने मुलाला लक्ष्य केल्याचे लक्षात येताच त्याच्या आईने क्षणाचाही विलंब न करता स्वतःच्या जीवाची पर्वा न करता कुत्र्याचा प्रतिकार केला. तिच्या धाडसी हस्तक्षेपामुळे कुत्र्याने मुलाला सोडून पळ काढला आणि पुढील अनर्थ टळला.या घटनेने ‘शहरातील गजबजलेल्या वस्तीतच जर लहान मुले सुरक्षित नसतील, तर प्रशासनाने नेमके काय करायचे?’ असा संतप्त सवाल पालकांकडून उपस्थित केला जात आहे. या घटनेनंतर अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यातील ग्रामीण भाग आणि तालुक्याच्या ठिकाणी भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

### भटक्या कुत्र्यांचा जैवविविधतेवरही परिणाम

पाळीव कुत्र्यांचा मानवी जीवनातील सहभाग वेगळा असला तरी मोकाट कुत्र्यांची संख्या एखाद्या परिसरात प्रमाणाबाहेर वाढल्यास त्याचा परिणाम सार्वजनिक आरोग्याबरोबरच स्थानिक पर्यावरणावरही होऊ शकतो. अन्नस्रोतांवरील वाढता ताण, लहान वन्यजीवांचा पाठलाग किंवा शिकार आणि रोगांचा संभाव्य प्रसार यामुळे स्थानिक जैवविविधतेवर परिणाम होण्याची शक्यता असते.त्यामुळे मोकाट कुत्र्यांचे शास्त्रोक्त व्यवस्थापन, निर्बीजीकरण, लसीकरण आणि कचरा व्यवस्थापन याकडे स्थानिक प्रशासनासह राज्य शासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. मानवी सुरक्षितता आणि प्राणी कल्याण यांचा समतोल राखत या समस्येवर दीर्घकालीन उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे.

## दै. आकर्षण निवडक

### साळवे कुटुंबावरील हल्ला प्रकरणी पोलीस संरक्षण व खोटा गुन्हा 'ब फायनल' करण्याची मागणी



अहिल्यानगर- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांच्या कुटुंबावर झालेल्या हल्ल्याच्या प्रकरणात त्यांच्या कुटुंबीयांना अद्यापही टोळीतील आरोपींकडून जीवितास धोका असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच साळवे कुटुंबाविरुद्ध दाखल करण्यात आलेला कथित खोटा गुन्हा 'ब फायनल' करून जखमी कुटुंबीय व साक्षीदारांना तातडीने पोलीस संरक्षण देण्यात यावे आणि गुन्ह्यातील काही फरार आरोपींना तात्कळ अटक करण्याची मागणी रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावेळी जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे, शहराध्यक्ष किरण दाभाडे, सतीश मगर, अविनाश भोसले, उत्कर्ष भालेराव, शुभम गायकवाड, राजेंद्र मगर, आदेश साळवे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात करण्यात आलेल्या आरोपानुसार, २४ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री सुमारे ११ वाजता टोळीतील काही व्यक्तींनी सुनिल साळवे यांच्या कुटुंबातील यशदीप संपत साळवे व आदर्श साळवे यांच्यावर हल्ला केला.

या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले असून, यशदीप साळवे यांचा एक डोळा निकामी झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. जखमींना उपचारासाठी जामखेड ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले होते. त्यावेळी डॉक्टरांनी गंभीर स्थिती पाहता त्यांना तातडीने अहिल्यानगर येथे हलविण्याचा सल्ला दिला. त्यानंतर कुटुंबीय जखमींना अहिल्यानगरला नेण्यासाठी निघाले असताना पुन्हा हल्ला झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदनानुसार, सुनिल साळवे यांच्या पत्नी रतन, भावजय रेश्मा, पुतण्या अभिजीत, भाचा अरविंद, त्यांची पत्नी सोनाली आणि लहान पुतण्या कोहिनूर हे रात्री सुमारे १२ वाजता नानज येथून जामखेडकडे येत असताना १५ ते १७ जणांच्या टोळीने तलवारी, कोयते व लोखंडी रॉडने हल्ला केला. या हल्ल्यात अभिजीतवर १७ ते १८ वार करण्यात आल्याचा आरोप असून, त्याच्या हातापायाला गंभीर दुखापत झाली आहे. पत्नी रतन यांच्या एका हाताला गंभीर इजा झाली असून, भावजय रेश्मा यांच्या मणक्याला गंभीर दुखापत झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.या घटनेनंतर साळवे कुटुंब दहशतीच्या वातावरणात

## नामस्मरणातून समाज परिवर्तन शक्य- ह.भ.प. नवनाथ महाराज शास्त्री

**श्री संत नामदेव महाराज संजीवन सोहळा उत्साहात साजरा : मिरवणुकीस उत्स्फूर्त प्रतिसाद, काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरण**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नामदेव शिंपी समाज ट्रस्टच्यावतीने सावेडी येथील शिंदे मळ्यातील श्री संत नामदेव महाराज मंदिरात संतश्रेष्ठ श्री संत नामदेव महाराज यांचा संजीवन सोहळा अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, मिरवणूक आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

नामदेव शिंपी समाज ट्रस्टच्यावतीने सावेडी येथील शिंदे मळ्यातील श्री संत नामदेव महाराज मंदिरात संतश्रेष्ठ श्री संत नामदेव महाराज यांचा संजीवन सोहळा अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी ह.भ.प. नवनाथ महाराज शास्त्री,अशोक वडे ,अनिल वनारसे ,कृष्णा भस्मे ,सुरेश लोळगे ,राजेंद्र बगाडे ,संतोष बोडगे ,दिलीप काकडे ,शिरीष लिमकर ,प्रमिला दुमाटे ,हेमलता वडे ,छाया लिमकर,निर्मला लोळगे ,पूजा वडे आदी उपस्थित होते

संजीवन सोहळयाचे एक दिवस अगोदर भव्य दिंडी मिरवणुक काढण्यात आली . या मिरवणुकीत समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. लहानग्यांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांचा उत्स्फूर्त सहभाग होता. महिलांचा सहभाग विशेष लक्षणीय होता. अनेक महिलांनी पारंपरिक वेशभूषेत, टाळ-मृदंगांच्या गजरात सहभागी होऊन मिरवणुकीला शोभा दिली. रस्त्याच्या कडेला महिला आणि बालकांनी आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या. काही ठिकाणी फुलांची उधळण करत, टाळ्यांच्या गजरात व भजन-गजर करत मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण परिसर एकदम भक्तिभावाने भारलेला होता.

तसेच संजीवन सोहळयाचे दिवशी सावेडी येथील शिंदे मळ्यात सकाळी १० ते १२ या वेळेत मच्छिन्द्रनाथ देवस्थान भालगाव येथील ह.भ.प. नवनाथ महाराज शास्त्री यांचे काल्याचे कीर्तन पार पडले. आपल्या रसाळ वाणीने आणि ओघवत्या शैलीत त्यांनी संत नामदेव महाराजांचे जीवनचरित्र, त्यांच्या भक्तीची गाथा, विठ्ठलभक्तीचा प्रभाव आणि त्यांनी समाजात दिलेला संदेश याचे प्रभावी वर्णन केले. ''नामस्मरण म्हणजे केवळ शब्द नव्हे, तो एक कृतीशील जीवनमार्ग आहे. संत नामदेवांच्या जीवनातून आपण समतेचा, सेवा भावनेचा आणि निर्भीड भक्तीचा मार्ग शिकू शकतो. नामस्मरणातून खरे समाज परिवर्तन घडते,'' असे त्यांनी सांगितले. त्यांच्या कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले होते.

यावेळी नामदेव शिंपी समाज ट्रस्टचे अध्यक्ष अशोक वडे म्हणाले की, ''संत नामदेव महाराजांनी समाजासमोर एक सश्रद्ध, सश्रवण आणि समर्पित जीवन जगण्याचा आदर्श ठेवला आहे. त्यांच्या कृतीतून उमटणारा समतेचा संदेश म्हणजेच आजच्या युगासाठी दीपस्तंभ आहे.'' त्यांनी ट्रस्टच्या कार्यकारिणी सदस्यांचे आणि उपस्थित नागरिकांचे मनः पूर्वक आभार मानले. समाजातील एकोप्याचा आणि सेवाभावाचा वारसा जपणे हीच संत नामदेवांना खरे अभिवादन असल्याचे त्यांनी नमूद केले.

## मेजर अमोल पळसकर यांचा सेवापूर्ती सोहळा खारेकर्जुनेमध्ये उत्साहात साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नायब सुभेदार अमोल पळसकर हे भारतीय सेनेमध्ये सप्लाय कोरमधून २२ वर्ष सेवा करून मूळ गावी खारेकर्जूने (ता.अ.नगर )येथे ढोल ताशाच्या गजरात डीजेवर देशभक्ती गीतामध्ये पंचक्रोशीतील शेकडो आजी-माजी सैनिक वीरणारी वीरपिता गावकऱ्यांच्या साक्षीने गावांमधून ओपन जीपमध्ये वाजत गाजत मिरवणूक काढून फटाकेंच्या आतीसबाजी मध्ये संपूर्ण गावामध्ये सडा रांगोळी काढून उत्साहात साजरा करण्यात आला.

जिल्हा परिषद सदस्य प्रताप पाटील शेळके यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की सैनिक जेव्हा रिटायर होतो तेव्हा खरी कसरत पणाला लागते.जोपर्यंत सैनिक सेवेत असतो तोपर्यंत त्याची सर्व वाह वाह करतात. पण रिटायरमेंट झाल्यानंतर घरापासून ते गावापर्यंत इतर सर्व जागेवर अडचणीला समोरी जावे लागते. सर्वात मोठे प्रश्न सैनिकांच्या शेताबद्दल अडचणी आहेत. आपलेच लोक त्रास देतात. येथेच त्यांचे खरे खच्चीकरण होते. त्यासाठी सैनिकांचे संघटन खूप महत्त्वाचे आहे.

यावेळी जिल्हा बँक संचालक रावसाहेब पाटील शेळके, आंबेजोगाई पीआय देविदास वाघमोडे,आरोग्य अधिकारी संतोष कराळे,त्रिदल सैनिक संघ अहिल्यानगरचे अध्यक्ष संजय मस्के,जिल्हा सैनिक कृती समिती श्रीगोंदा येथील कॅप्टन धारकुंडे,जयहिंद माजी सैनिक संस्थेचे अध्यक्ष मेजर निळकंठ उल्हारे,पारनेर तालुका भूमापन अधिकारी अविनाश ठोकळ मेजर, पोलीस अंमलदार मनोज खैरे,प्रताप तोडमल,ग्राम महसूल अधिकारी अरुण देवकर,वीरनारी संगीता कातोरे,भावनाताई शिंदे,नारायण झिने यांनी शुभेच्छा देऊन सैनिक जीवनावरती अर्थपूर्ण प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मेजर नाना निमसे होते.या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यामधून पीआय देविदास वाघमोडे हे उपस्थित राहून त्यांनी अमोल पळसकर यांनी जीवनात केलेल्या संघर्षाबद्दल आपल्या आठवणी सांगितल्या.

## हिवरे कोरडा व भाळवणीत केबल चोरांचा धुमाकूळ!

**विहिरींवरील केबल चोरीने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण; शेतीच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील भाळवणी व हिवरे कोरडा परिसरात विहिरींवरील विद्युत केबल चोरीच्या घटनांनी धुमाकूळ घातला आहे. रात्रीच्या वेळी शेतातील विहिरींवरील केबल कापून नेण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

भाळवणी परिसरातील कपाळे मळा तसेच हिवरे कोरडा परिसरातील शेतकऱ्यांच्या विहिरींवरील केबल चोरीला गेल्याने शेतीच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होत आहे. केबल चोरीनंतर नवीन केबल बसविण्यासाठी शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

केबल चोरीच्या वाढत्या घटनांमुळे रात्रीच्या वेळी शेतात जाणेही शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. भाळवणी येथील विजय पवार व हिवरे कोरडा येथील सागर कोरडे यांनी केबल चोरीच्या प्रकाराबाबत तक्रार करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

केबल चोरीमुळे विहिरीवरील विद्युत मोटारी बंद पडत असून पिकांना पाणी देण्यात अडथळा निर्माण होत आहे. चोरी गेलेल्या केबलचा खर्च तसेच नवीन केबल बसविण्याचा खर्च शेतकऱ्यांनाच करावा लागत असल्याने आर्थिक नुकसान होत आहे. केबल चोरीच्या घटना तातडीने थांबवून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी विजय पवार व सागर कोरडे यांनी केली आहे.

## शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान स्विकारावे – कृषी अधिकारी रावसाहेब नवले

**नेप्तीत 'महाविस्तार एआय ॲप'चा जागर पीक नियोजन एका क्लिकवर ; ॲप शेतकऱ्याचा मित्र शेतकऱ्यांमध्ये उत्साह**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथील शेतकऱ्यांना शेतीतील बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेताना अचूक आणि वेळेवर माहिती मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हवामानातील बदल, पिकांवरील रोग-किडींचा प्रादुर्भाव, बाजारभावातील चढ-उतार आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञान याबाबतची माहिती शेतकऱ्यांच्या हातात सहज उपलब्ध व्हावी, या उद्देशाने कृषी विभागाच्या वतीने महिन्याच्या प्रत्येक मंगळवारी गावागावांत 'महाविस्तार दिवस' साजरा करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने तालुका कृषी अधिकारी अशोक वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली नेप्ती येथे 'महाविस्तार एआय ॲप' डाऊनलोड करून देत शेतकरी व ग्रामस्थांमध्ये ॲपच्या वापराबाबत जनजागृती करण्यात आली. पीक नियोजन एका क्लिकवर समजत असल्यामुळे हा ॲप शेतकऱ्यांचा मित्र आहे त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

आजच्या काळात शेती केवळ अनुभवाच्या जोरावर न करता उपलब्ध तंत्रज्ञान, माहिती आणि शास्त्रीय मार्गदर्शनाच्या आधारे करणे ही काळाची गरज आहे. पिकाची निवड, पेरणीची वेळ, पिकांवरील रोग-किडींचे व्यवस्थापन, हवामानाचा अंदाज, बाजारपेठेतील परिस्थिती अशा अनेक बाबींचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होत असतो. त्यामुळे योग्य वेळी योग्य माहिती मिळणे हे शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

## संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त माळीवाड्यात शोभायात्रा

**महिला आणि बाल वारकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा येथे श्री विशाल गणेश मंदिर देवस्थान व उत्सव समितीच्या वतीने भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेचा प्रारंभ माळीवाडा येथील शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिराचे महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते श्री संत सावता महाराज यांच्या रथातील तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून करण्यात आला.

कार्यक्रमास देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, उत्सव समितीचे प्रमुख छबू नाना जाधव, माजी महापौर भगवान फुलसुंदर, ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे, संभाजी कदम, दत्ता गाडळकर ,सुवर्णा जाधव, मंगल ताई लोखंडे, पंडितराव खरपुडे, ,पांडुरंग नन्नवरे ,सुरेखा कदम , दत्ता जाधव, विष्णुपंत म्हस्के, बजरंग भुतारे, ज्ञानेश्वर रासकर, , संजय चाफे, माणिकराव विधाते,रंगनाथ फुलसौंदर,विजय कोथिंबिरे, चंद्रकांत फुलारी ,नितीन शेरकर , नितीन पुंड ,, सुभाष राऊत, परेश लोखंडे ,बाळासाहेब पुंड, चंद्रकांत ताठे, ह. भ. प. जालिंदर महाराज निकम, , जालिंदर बोरुडे ,केलास खरपुडे ,आदींसह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

या शोभायात्रेत महिलांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. अनेक महिलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून डोक्यावर कलश घेऊन सहभाग नोंदवला. तसेच आळंदी येथून आलेल्या बाल वारकर्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात भक्तिगीतांवर सादरीकरण करत संपूर्ण शोभायात्रेला अध्यात्मिक रंगत दिली.

माळीवाडा येथील श्री विशाल गणपती मंदिराचा रथही शोभायात्रेचे मुख्य आकर्षण ठरला. या रथामध्ये संत सावता महाराज यांचे तैलचित्र आकर्षक फुलांच्या सजावटीसह ,विद्युत रोषणाई करण्यात आले होते, ज्याचे उपस्थितांनी मोठ्या भक्तिभावाने दर्शन घेतले.

ही भव्य शोभायात्रा माळीवाडा वेशीपासून सुरू होऊन फुलसुंदर चौक, ब्राह्मण गल्ली, बारातोटी कारंजा, इवळे गल्ली, कौटीची तालीम चौक, ढोर गल्ली मार्ग पुन्हा माळीवाडा चौकात विसर्जित झाली. संपूर्ण मार्गावर नागरिकांनी रथावर पुष्पवृष्टी करत उत्सवाचे स्वागत केले.

## शब्दकोडे क्रमांक : २८



**आडवे शब्द :** १.आकाश ३. थंड ५. साधना करणारा ७. सोबत ८. प्रजा १०. कसाई १२. व्याघ्र १४. पद १५. मानसिक आधार १६. चोपडी १७. आकाश २०. झाडाची फांदी २३. रीतीनुसार २६. वेगात असलेला २८. पायताण २९. कृष्ण सखी ३०. माता ३२. एक अंतर ३३. हिंदीत-मी ३४. सतत हसणारा ३७. मोठ्या भावास आपण हाक मारतो ३९. निगा ४०. एक जलाशयाचा प्रकार ४२. ढीग ४३. एखादी बाब लपवण्यासाठी केलेली शब्दांची लपवाछपवी ४५. सुके खोबरे नासल्यावर येणारी चव ४६. इंग्रजीत-लहान ४९. सिंह ५०. अविरत ५१. एक प्रसिद्ध गुजराती खाद्य पदार्थ

**उभे शब्द :** १.शेवट २. वनात राहणारा किंबहुना पशू सारखा वागणारा ३. मराठी ध्वज पताक्याचा रंग ४. हाथ ५. सप्त ६. कसरत १०. मिठाची चव ११. खोट्या दातांचा संच १३. नभ १८. पोकळ नसलेला १९. कूर्म गतीने चालणारा २१. लोभ २२. संत २४. विहिरीवरून पाणी काढण्याचे पारंपारीक यंत्र २५. अतिभव्य २६. भीती २७. निवास ३०. जिन्नस ३१. कंबर ३२. एक पीठाचा प्रकार ३४. उपस्थित ३५. हिंदीत-रात्र ३६. साहेब ३७. सेवक ३८. तुरटीची चव ३९. वस्ती ४१. कौतुक ४२. एक कृष्णाचे नाव ४३. शिकार ४४. ओवी ४५. सच्चा ४७. फायदा ४८. कंकड

**शब्दकोडे क्रमांक : २७ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| य | व | त | मा | ळ | | वा | स | ना | | दि | वा |
| म | | पा | स | | टो | | रा | | पु | ला | व |
| रा | व | स | | प | | चा | व | डी | | सा | |
| ज | म | | स | र | ब | त | | प | त | | चा |
| | न | फ | र | त | | क | प | | वा | द | क |
| मो | | र | स | | का | | ल | क | | बा | |
| का | र | क | | क | म | ळ | | ल | ग | | पे |
| ट | क | | नी | | गा | | मो | ह | | खो | टा |
| | म | त | | स | र | ग | म | | अ | | रा |
| वा | | वा | य | दा | | दा | | सु | दा | मा | |
| ज | ल | | म | | आ | रो | प | | का | | तो |
| वी | | मा | न | व | | ळ | | सु | रा | व | टा |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### राहुल शेलार यांना पी.एच.डी. पदवी प्रदान



अहिल्यानगर - येथील 'ड्रम सेंटर' या स्टुडिओचे संचालक तथा 'पडघम' वाद्य संगीताचे ध्वनीमुद्रण आणि तांत्रिक शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेले डॉ. राहुल शेलार यांनी मराठी साहित्य संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करीत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पी. एच.डी.) पदवी प्राप्त केली आहे. विद्यापीठाकडून पदवी जाहीर झाल्याचे अधिकृत पत्र नुकतेच त्यांना प्राप्त झाले आहे. त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक, साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात त्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. यावेळी पेमराज सारडा महाविद्यालय अहिल्यानगरच्या प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित, बहिस्त परिक्षक प्रा. डॉ. उमेश मुंडे, मार्गदर्शक प्रा. डॉ. अशोक डोळस, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे आदि मान्यवर उपस्थित होते. डॉ. राहुल शेलार यांनी अहिल्यानगर येथील पेमराज सारडा महाविद्यालयाच्या मराठी संशोधन केंद्रातून केंद्रप्रमुख प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित आणि मार्गदर्शक प्रा. डॉ. अशोक डोळस यांच्या मार्गदर्शनाखाली 'द. मा. मिरासदार व शंकर पाटील यांच्या ग्रामीण व विनोदी कथात्म साहित्याचे स्वरूप आणि चिकित्सा' या विषयावर संशोधन प्रबंध सादर करीत, प्रमाण मराठी आणि ग्रामीण बोली अशा मिश्र भाषेचा भाषा शास्त्रीय व 'विनोद' या संकल्पनेच्या स्वरूपाचा चिकित्सक अभ्यास मांडलेला आहे. मराठी साहित्याच्या अभ्यासात महत्त्वाचे स्थान असलेल्या या संशोधनातून मराठी ग्रामीण साहित्याला अनोख्या शैलीने समृद्ध करणारे दोन दीपस्तंभ म्हणजे द. मा. मिरासदार आणि शंकर पाटील या प्रतिथयश लेखकांच्या कथारचनेतील घटक व कलात्मक जाणीवेतून अभिव्यक्त झालेल्या भाषिक प्रयोगाचे स्वरूप, तसेच ग्रामीण सामाजिक जाणिवा, साहित्यिक मूल्ये आणि विनोद हा केवळ 'हसवण्यासाठी' नसून तो मराठी ग्रामीण लोकसंस्कृतीचा व मानवी मानसशास्त्राचा महत्त्वपूर्ण भाग असल्याची वस्तुनिष्ठ आणि सामाजिक स्वास्थाच्या दृष्टीने मूल्यवर्धनसापेक्ष मांडणी डॉ. राहुल शेलार यांनी आपल्या प्रबंधात केली आहे. या संशोधनामुळे मराठी कथात्म साहित्यातील भाषाशास्त्रीयदृष्ट्या, मराठी प्रमाण व ग्रामीण बोली या मिश्र भाषा वापरामागील प्रयोजनाच्या स्वरूपाची आणि कलात्मक अभिव्यक्तीतून निर्माण होणार्या विनोदात्म धर्माचे चिंतन व मूल्यमापन होण्यास मदत झाली असून, संशोधन क्षेत्रात हा अभ्यास उपयुक्त संदर्भग्रंथ ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. साहित्य अभ्यासक, संशोधक आणि विद्यार्थ्यांसाठीही हे संशोधन दिशादर्शक ठरणार असल्याचे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे.

### पिसाळ बंधूंची सुवर्ण कामगिरी

अहिल्यानगर - केडगाव येथील राष्ट्रीय खेळाडू विराज पिसाळ व क्षितिज पिसाळ



या बंधूंनी बेंगलोर येथे झालेल्या तायक्कांदो स्पर्धेत सुवर्ण पदकांची कमाई केली. दोन्ही खेळाडू केंद्रीय विद्यालय क्रमांक १ अहिल्यानगर या शाळेच्या माध्यमातून जलहली बेंगलोर येथील केंद्रीय विद्यालय संघटन समिती अंतर्गत खेळल्या गेलेल्या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. दोन्ही बंधूंची स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. विराज गजेंद्र पिसाळ हा १९ वर्षा वयोगटात ५१ ते ५५ किलो वजन गटात खेळला असून, क्षितिज पिसाळ १४ वर्षे वयोगटात ३१ ते ३५ किलो वजनगटात खेळला आहे. सदरच्या स्पर्धा ७ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट मध्ये पार पडल्या. दोन्ही खेळाडूंच्या यशाबद्दल केंद्रीय विद्यालय क्रमांक १ चे प्राचार्य, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच एकलव्य तायकंदो स्पोर्ट्स असोसिएशनचे सर्व प्रशिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. दोन्ही खेळाडू अहिल्यानगर बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. गजेंद्र पिसाळ व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक शाळेचे उपशिक्षिका स्मिता पिसाळ यांचे मुले असून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे जेष्ठ संचालक अंबादास पिसाळ यांचे नातू आहेत. त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## महानगरपालिकेने नवीन बांधकाम परवान्यासोबत पाणीसाठा बंधनकारक करावा - तुलसीराम पालीवाल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरात १ लाख ३० हजारांपेक्षा जास्त नोंदणीकृत मालमत्ता आहेत. जर या सर्व मालमत्तांवर पावसाचे पाणी साठवणूक सक्तीने राबवली तर दरवर्षी कोट्यवधी लिटर पाणी जमिनीत मुरवता येईल. त्यामुळे भूगर्भातील पाण्याचा साठा वाढेल आणि शहरातील बोअरवेलची पाणी पातळी टिकून राहण्यास मदत होईल. व बोअरवेल च्या पाण्यामधील क्षार कमी होईल या करिता महानगरपालिकेने नवीन बांधकाम परवान्यासोबत पाणी साठा बंधनकारक करावी अशी मागणी तुलसीराम पालीवाल वृक्ष प्राधिकरण सदस्य, अहिल्यानगर यांनी मा. आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या कडे एका पत्रकान्वये केली आहे.

सध्या शहरात मोठ्या प्रमाणावर सिमेंट काँक्रीट रस्त्यांची कामे सुरू आहेत. सिमेंटमुळे पाणी जमिनीत मुरत नाही. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना वैयक्तिकरित्या रेन वॉटर हार्वेस्टिंग तांत्रिकदृष्ट्या कठीण आणि खर्चिक होते. तसेच अनेक नवीन बांधकामांमध्ये नियम असूनही बसवले जात नाही.म्हणून नवीन बांधकाम परवाना देताना नियमानुसार ''रेन वॉटर हार्वेस्टिंग उपाययोजना करणे बंधनकारक करावे. तसेच ची प्रक्रिया पूर्ण न केल्यास बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देऊ नये. या सामाजिक विषयात कोणतीही तडजोड होऊ नये यासाठी कठोर उपाययोजना करावी. तसेच महानगरपालिका ज्या प्रकारे नवीन रस्त्याच्या कामात सांडपाणी चेंबर आणि नळ कनेक्शनचा खर्च करते, त्याच धर्तीवर रेन वॉटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चरचा खर्चही महानगरपालिकेने करावा व सध्या सुरू असलेल्या रस्त्यालगतच्या सर्व मालमत्तांना रेन वॉटर हार्वेस्टिंग बसवण्याच्या नोटीस द्याव्यात. शहरातील सर्व १,३०,०००+ जुन्या मालमत्तांची ९० दिवसात तपासणी करून रेन वॉटर हार्वेस्टिंग नसल्यास दंडासह बसवणे बंधनकारक करावे, त्यासाठी अनुदान व जनजागृती मोहीम राबवावी अशी मागणी पालीवाल यांनी केली आहे.

तसेच पाणी ही मूलभूत गरज आहे. वेळीच कठोर निर्णय न घेतल्यास भविष्यात बोअरवेल पूर्णपणे कोरडे पडतील, त्या करिता या सामाजिक समस्या कायमची सुटण्या करिता योग्य ती कार्यवाही करावी अशीही मागणी तुलसीराम पालीवाल मा. आयुक्त यांच्या कडे केली आहे.

## धरण क्षेत्रात मत्स्य व्यवसाय विकासासाठी संयुक्त सर्वेक्षण करणार– ना. विखे पाटील

### मत्स्य व्यवसाय विकास मंत्री नितेश राणे यांच्यासह संयुक्त बैठकीत प्रतिपादन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** जलसंपदा विभागाच्या धरणांमध्ये मत्स्य व्यवसाय विकास विभागाशी सहकार्य आणि समन्वय वाढवण्यात येणार आहे. स्थानिक मच्छीमारांना प्राधान्य देता यावे यादृष्टीने दोन्ही विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेली संयुक्त समिती सर्वेक्षण करण्यात येईल , अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली यावेळी मत्स्य व्यवसाय विकास मंत्री नितेश राणे, आमदार प्रकाश सावंत, प्रधान सचिव रामास्वामी एन, सचिव लाभक्षेत्र विकास प्रकाश मिसाळ, मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त प्रेरणा देशभ्रतार , जलसंपदा आणि मत्स्य व्यवसाय विकास विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील पुढे म्हणाले या दृष्टीने विभागाने आधीच पावलं टाकले असून उजनी धरणातील मासेमारी विकास साठी प्रक्रिया राबविण्यासाठी सुरुवात केली गेली आहे. मराठवाडा पश्चिम महाराष्ट्र विभागातील अशा धरणांची माहिती देखील एकत्रित केली जाईल या दृष्टीने त्यांनी यावेळी निर्देश दिले. जलसंपदा मंत्री विखे पाटील म्हणाले जलसंपदा आणि मत्स्यव्यवसाय विकास विभागाच्या वतीने संयुक्तरित्या अशा धरणांच्या माहितीचा सर्वेक्षण आणि विश्लेषण करून कार्यवाही करण्यास गती देण्यात येईल. यासाठी जलसंपदा विभागाच्या चारही मुख्य अभियंता यांना जबाबदारी देण्यात येत असून गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ यामधील धरणांमध्ये मासेमारीच्या दृष्टीने आवश्यक माहिती एकत्रित केली जाईल.

मत्स्य व्यवसाय विकास मंत्री नितेश राणे म्हणाले, जलसंपदा विभागाशी समन्वय राखण्यासाठी मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त यांना जबाबदारी देण्यात येत आहे. मत्स्य व्यवसाय विभागाच्या वतीने जवळपास २५०० धरण आणि तलाव यातील मासेमारीसाठी मच्छीमारांच्या सहकारी संस्थांना संधी दिली जाते. विभागाने याबाबत पारदर्शक व आधुनिकता आणण्यासाठी डिजिटायझेशन, मॅपिंग केले गेले आहे आणि रियल टाईम डाटा सर्विसलेन्स प्रणाली कार्यरत केली आहे. जलसंपदा विभागाच्या विविध धरणांमध्ये देखील स्थानिक मच्छीमारांना मासेमारीसाठी संधी मिळावी यादृष्टीने विभाग प्रयत्नशील आहे असे मंत्री श्री राणे म्हणाले. यासह जलसंपदा विभागाच्या अंतर्गत धरणांमधील गाळ काढण्यासाठी व जल साठवण क्षमता वाढविण्यासाठी कार्यवाही केली जाते त्या मध्ये मत्स्य व्यवसाय विभागाच्या अखत्यारीत असलेल्या धरणातील व तलावातील गाळ काढण्यासाठी देखील सहकार्य मिळावे असे श्री राणे म्हणाले. यावेळी गोड्या पाण्यातील मासेमारी, सहकारी मच्छीमार संस्था, तलावातील मासेमारीसाठी ठेका पद्धती, दोन्ही विभागांशी संबंधित विविध बाबी, मासेमारीसाठी राबविण्यात येणारी प्रक्रिया आदी विषयाबाबत चर्चा झाली.

## ईसारवाडीत ऑनलाइन चक्री जुगाराचा पर्दाफाश; ३१ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** एमआयडीसी पैठण पोलिसांनी ईसारवाडी येथील पेपरमील परिसरात कारवाई करून ऑनलाइन चक्री जुगाराचा पर्दाफाश केला. या कारवाईत ३१ हजार ७५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एका संशयिताविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ ऑगस्ट रोजी रात्री साडेसातच्या सुमारास ईसारवाडी येथील पेपरमील परिसरातील 'ओम साई' नावाच्या पत्र्याच्या शेडमध्ये ऑनलाइन चक्री जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कारवाई केली.

या कारवाईत भुपेंद्र रविंद्रराजे भोसले (वय ३७, रा. शाहूनगर, ईसारवाडी, ता. पैठण) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी लोकांकडून पैसे स्वीकारून आकडे लिहिलेल्या चार्टवर पैशांची पैज लावत 'ऑनलाइन चक्री' नावाचा जुगार खेळत व खेळवत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी घटनास्थळावरून १,१५० रुपये रोख, ३० हजार रुपये किमतीची एलसीडी स्क्रीन व सीपीयू, ५०० रुपये किमतीचे की–बोर्ड व माऊस तसेच १०० रुपये किमतीचा ऑनलाइन चक्रीचा कागदी चार्ट, असा एकूण ३१ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी मिलिंद काकासाहेब घाटेश्वर यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पैठण पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक २६१/२०२६, कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार सिंगल करीत आहेत.

## सावता महाराजांचे विचार आचरणात आणा – आकाश महाराज फुले

### नेप्तीत सावता महाराज पुण्यतिथी उत्साहात साजरी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथे श्री संत शिरोमणी सावता महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पुण्यतिथीनिमित्त तीन दिवस भक्तीचा महापूर आला होता. श्री संत सावता महाराज तरुण मंडळ, माळी समाज व नेप्ती ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखंड हरिनाम सप्ताह मंगळवारी काल्याच्या कीर्तनाने आणि महाप्रसादाने मोठ्या उत्साहात संपन्न झाला अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

रविवार ९ ऑगस्ट ते मंगळवार ११ ऑगस्ट या कालावधीत झालेल्या या धार्मिक सोहळ्याला पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी हजेरी लावली. सप्ताहाचे उद्घाटन ह.भ.प. शिवचरित्रकार आकाश महाराज फुले यांच्या हस्ते वीणा पूजनाने झाले. तीन दिवस दररोज सायंकाळी हरिपाठानंतर रसभरीत किर्तनाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता.





पहिल्या दिवशी ज्ञानाई मुलींची वारकरी शिक्षण संस्था, नेप्तीच्या अनुष्का दिदी जाधव यांनी तर दुसऱ्या दिवशी ह.भ.प. श्री शंकर महाराज लोखंडे, कोल्हार खुर्द यांनी किर्तन केले. सांगता दिनी सकाळी ह.भ.प. शिवचरित्रकार आकाश महाराज फुले यांच्या काल्याच्या कीर्तनाने संपूर्ण गाव भक्तिमय झाले.

सावता महाराज म्हणजे केवळ संत नव्हते, ते शेतकऱ्यांचे दैवत होते. एका हातात नांगर आणि दुसऱ्या हातात टाळ घेऊन त्यांनी जगाला कर्म हेच पूजन हा संदेश दिला. शेती करूनही त्यांची भक्ती कधी कमी झाली नाही. आजच्या काळात आपण शेतीला दुय्यम समजतो, पण सावता महाराजांनी शेतातूनच परमेश्वर गाठला.

हा थोर संत आजही आपल्याला शिकवतो की प्रपंच आणि परमार्थ दोन्ही एकत्र निभावता येतात. आपली माती, आपली शेती आणि आपली संस्कृती जपली पाहिजे. तरुणांनी मोबाईल बाजूला ठेवून थोडा वेळ तुकोबांचा अभंग आणि सावता महाराजांचे चरित्र वाचले पाहिजे. तरच आपले गाव, आपला समाज प्रगती करेल. त्यामुळे सावता महाराजांचे विचार आचरणात आणा असे प्रतिपादन शिवचरित्रकार आकाश महाराज फुले यांनी केले.

आकाश महाराजांच्या ओजस्वी वाणीतून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक शब्दाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले होते. कीर्तनानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. ज्ञानाई मुलींची वारकरी शिक्षण संस्था व नेप्ती भजनी मंडळ यांनी तीनही दिवस उत्तम साथसंगत दिली.
हा सप्ताह शांततेत आणि भक्तिभावात पार पाडण्यासाठी सावता महाराज तरुण मंडळ आणि ग्रामस्थांनी रात्रंदिवस मेहनत घेतली.

## जायकवाडीचे दरवाजे बंद; कालव्यांतून सिंचनासाठी पाणी सुरू

दैनिक आकर्षण । हारून शेख

**पैठण–** जायकवाडी धरणाच्या दरवाजांतून ३३ दिवसांपासून सुरू असलेला विसर्ग अखेर बंद करण्यात आला आहे. मात्र, दोन्ही कालव्यांतून प्रत्येकी २ हजार १०० क्युसेकप्रमाणे पाणी सोडणे सुरूच आहे. सध्या धरणात ९३ टक्क्यांपेक्षा अधिक पाणी वापरयोग्य साठा उपलब्ध असल्याने सिंचनासाठी मोठा दिलासा मिळाला आहे. मान्सूनचा पाऊस लांबल्याने जून महिन्यात जायकवाडी धरणाच्या पाणीसाठ्यात लक्षणीय घट झाली होती. मात्र, ६ जुलैपासून नाशिक व अहिल्यानगर भागात झालेल्या पावसामुळे नाथसागर जलाशयात पाण्याची आवक वाढली. ९ जुलैपासून धरणाच्या पाणीसाठ्यात प्रथमच तीन टक्क्यांची वाढ झाली. धरणाच्या पाणीसाठ्यात सातत्याने आवक होत असल्याने कृषी सिंचनासाठीची बंदी उठविण्यात आली होती. २७ जुलैपासून



दोन्ही कालव्यांतून पाणी सोडले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना खरीप पिकांसाठी मोठा दिलासा मिळाला आहे. जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्यातून सध्या १ हजार १०० क्युसेक, तर उजव्या कालव्यातूनही १ हजार १०० क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे. या पाण्यामुळे चार जिल्ह्यांतील सुमारे दीड लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांना सिंचनाचा लाभ होणार आहे. दरम्यान, १३२ किलोमीटर लांबीच्या उजव्या कालव्यातून माजलगाव प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरण्यासाठीही पाण्याचा विसर्ग केला जात आहे.

## वारस हक्काची नियुक्ती रखडली; सफाई कर्मचारी संघटनेचा आक्रमक पवित्रा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारस हक्काने नियुक्ती आदेश देण्यात यावा, तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांची तातडीने पूर्तता करावी, या मागणीसाठी अखिल महाराष्ट्र सफाईगार व चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय तसेच राहुरी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रलंबित प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, कै. श्याम अमीर बिवाल यांच्या पत्नी शिलाबाई बिवाल यांनीही आपल्या प्रलंबित नोकरीच्या प्रश्नावर तीव्र भूमिका घेतली आहे. १९८४ पासून प्रलंबित असलेल्या नोकरीच्या आदेशाबाबत तातडीने निर्णय न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी



जिल्हाधिकारी कार्यालया समोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. तसेच प्रशासनाने या मागणीवर तातडीने कार्यवाही न केल्यास आंदोलनाचा इशारा संघटनेने दिला आहे. जिल्ह्यातील विविध नगरपरिषदांमधील सफाई कर्मचारी तसेच संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या सहभागातून १८ ऑगस्ट रोजी राहुरी नगरपरिषद कार्यालयासमोर 'भव्य झाडू आंदोलन' करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

राहुरी नगरपरिषदेमध्ये सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत असलेले कै. श्याम अमीर बिवाल यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पदावर लाड-पागे समितीच्या धोरणानुसार वारस हक्काने सौ. ज्योती मनीष सोलंकी यांचे नाव नामनिर्देशित करण्यात आले आहे. नियुक्तीसाठी आवश्यक असलेली सर्व कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता वारसांकडून यापूर्वीच करण्यात आली असल्याचा दावा संघटनेने केला आहे. मात्र, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही अद्याप नियुक्ती आदेश देण्यात आलेला नसल्याने बिवाल कुटुंबीयांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

सफाई कर्मचारी कुटुंबातील वारसाला शासनाच्या धोरणानुसार हक्काची नोकरी मिळणे अपेक्षित असताना प्रशासनाकडून नियुक्ती आदेश देण्यास विलंब होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

## नशा मुक्त शहरासाठी अहमदनगर उर्दू शाळेची जनजागृती रॅली

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा पोलीस दल व जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'नशा मुक्त अहिल्यानगर' अभियानातंर्गत नागोरी मुस्लिम मिसगर जमात ट्रस्ट संचालित अहमदनगर उर्दू प्रायमरी स्कूल, अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर ज्युनिअर कॉलेज यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांनी शहरातून जनजागृती रॅली काढली. या रॅलीद्वारे नशामुक्तीचा संदेश देण्यात आला.

रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीचा संदेश देणारे विविध फलक हातात घेत नागरिकांमध्ये प्रभावी जनजागृती करण्यात आली.



''नशा छोडो, भारत जोडो'', ''नशा मिटाव, देश बचाव'', ''भविष्य बनाव, सेहत का खयाल रखो'' अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी मंगलगेट, कोठला भागातून रॅली काढली. या घोषणांमुळे परिसर व्यसनमुक्तीच्या संदेशाने दुमदुमून गेला.

पोलीस प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांनी अहिल्यानगर जिल्हा व्यसनमुक्त करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली. समाजातील तरुण पिढीला अंमली पदार्थ व इतर व्यसनांपासून दूर ठेवण्याचा तसेच निरोगी व सुदृढ समाज घडविण्याचा संकल्पही सर्वांनी व्यक्त केला.

या अभियानासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांचे मार्गदर्शन लाभले. या रॅलीत शालेय विद्यार्थ्यांसह शिक्षक देखील सहभागी झाले होते.

## तंबाखू, दारू विक्रीविरोधात एमआयडीसी पैठण पोलिसांची धडक कारवाई

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** एमआयडीसी पैठण पोलिसांनी अवैध तंबाखूजन्य पदार्थांची विक्री आणि विनापरवाना देशी दारू बाळगणाऱ्यांविरोधात कारवाई करत दोन स्वतंत्र गुन्हे दाखल केले. ढोरकीन आणि गेवराई बार्शी परिसरात १२ ऑगस्ट रोजी झालेल्या या कारवाईत दारू व तंबाखूजन्य पदार्थ असा एकूण १ हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ढोरकीन येथील कुलस्वामिनी पेट्रोल पंपासमोरील सोम पान सेंटरमध्ये अमोल ज्ञानदेव रंधे (वय २५) हा जिल्हा परिषद शाळेजवळ तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करताना आढळून आला. पोलिसांनी त्याच्याकडून ७ गायछाप तंबाखूच्या पुड्या आणि २ बिडी बंडल, असा १३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी गुन्हा क्रमांक २६२/२०२६ अन्वये कलम ६ (ब) व २४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या कारवाईत गेवराई बार्शी येथे हरीचंद्र गणपत जाधव (वय ६३) हा राहत्या घरासमोरील पत्र्याच्या शेडमध्ये विनापरवाना देशी दारू विक्रीच्या उद्देशाने बाळगताना आढळला. त्याच्याकडून १८० मिलीच्या देशी दारूच्या १३ सिलबंद बाटल्या, असा १ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी गुन्हा क्रमांक २६३/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास एमआयडीसी पैठण पोलिसांकडून सुरू असून, अवैध तंबाखू व दारू विक्रीविरोधात पोलिसांची कारवाई सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# डॉ. विखे पाटील कृषि महाविद्यालय, विळद घाट यांच्यातर्फे शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**तज्ज्ञांचे बहुमूल्य मार्गदर्शन । वांबोरी येथे खरीप मार्गदर्शनासाठी शेतकरी मेळावा उत्साहात**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कृषि महाविद्यालय, विळद घाट यांच्या वतीने ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम २०२६-२७ अंतर्गत शेतकरी मेळावाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून मा. श्री. रामहरी मिसाळ (कृषि मंडळ अधिकारी,वांबोरी), मा.श्री. एस. बी. केळकंदे (उपकृषी अधिकारी, वाबोरी), श्री.पी. एस.धांबोरे व श्री. प्रवीण भालेराव (सहाय्यक कृषी अधिकारी, वांबोरी), प्रा. संदिप डमाळे, प्रा.डॉ. दीपिका मावळे (सहाय्यक प्राध्यापक, कृषी महाविद्यालय, विळदघाट) तसेच कृषिमित्र श्री. सोमनाथ तोडमल उपस्थित होते.

कार्यक्रमास कृषी महाविद्यालयाचे कार्यक्रम समन्वयक प्रा. के. एस. दांगडे, तसेच गावातील प्रगतशील शेतकरी श्री गणेश जवरे, श्री. संदीप विधाटे, श्री. युवराज पठारे यांच्यासह अनेक शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना मंडळ कृषी अधिकारी मा. श्री. रामहरी मिसाळ यांनी कृषी विभागाच्या विविध योजनाची सखोल माहिती देत शेतकऱ्यांच्या विविध समस्यांचे समाधान केले. तसेच प्राध्यापक संदीप डमाळ यांनी डाळिंब पिकातील कीड व रोग यावरील समस्या व त्याचे एकात्मिक व्यवस्थापनावर सखोल मार्गदर्शन केले तसेच प्रा. डॉ. दीपिका मावळे यांनी पिकाची पाण्याची गरज व अचूक सिंचन पद्धती यावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी माननीय श्री. सुभाषरावजी पाटील साहेब माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती, श्री. किरण ससाने सरपंच वांबोरी तसेच डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन, विळद घाट (अहिल्यानगर) चे संचालक (तांत्रिक) प्रा. सुनील कल्हापुरे तसेच कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. सोमेश्वर राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. के. एस. दांगडे यांनी व सूत्रसंचालन कृषिदूत कु. प्रणव बानकर यांनी केले.आभार प्रदर्शन गावचे सहाय्यक कृषि अधिकारी श्री. प्रवीण भालेराव यांनी मानले.

# नशामुक्त समाजासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा – मा. मधुकर काळे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**टाकळीढोकेश्वर –** ''आजच्या युवकांनी व्यसनांपासून दूर राहून नशामुक्त समाजाच्या निर्मितीसाठी पुढाकार घ्यावा. युवकांची सकारात्मक ऊर्जा आणि सामाजिक बांधिलकी यामुळे व्यसनमुक्त समाज निर्माण होऊ शकतो,'' असे प्रतिपादन परिहार व्यसनमुक्ती, पुनर्वसन व मानसिक आरोग्य केंद्र, टाकळी खातगाव, अहिल्यानगरचे संचालक मा. मधुकर काळे यांनी केले. श्री ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे राष्ट्रीय सेवा योजना () विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना ( ) उद्घाटन व ''नशामुक्ती : आजची गरज आणि युवकांची भूमिका'' या विषयावर आयोजित मार्गदर्शनपर व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. मतकर यांनी विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून निरोगी व सकारात्मक जीवनशैली स्वीकारावी आणि नशामुक्त समाज निर्मितीसाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी मा. मधुकर काळे यांनी व्यसनाधीनतेचे शारीरिक, मानसिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनावर होणारे दुष्परिणाम विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. युवकांनी स्वतः व्यसनांपासून दूर राहण्याबरोबरच आपल्या मित्रपरिवारात व समाजात नशामुक्तीचा संदेश पोहोचवावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शुभांगी पवार यांनी केले. त्यांनी नशामुक्ती अभियानाची गरज, व्यसनांचे वाढते प्रमाण आणि युवकांची सामाजिक जबाबदारी याविषयी भूमिका मांडली. पाहुण्यांचा परिचय प्रा. किशोर कांबळे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संकेत ठाणगे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय सुरोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# वोक्हार्ट हॉस्पिटल नागपूरमध्ये स्कारलेस थायरॉईड शस्त्रक्रिया; सुरक्षित, जलद आणि आधुनिक पद्धतीने उपचार

**डॉ. अंकुर मिश्रा, कन्सल्टंट जनरल आणि मिनिमल ॲक्सेस सर्जन, वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कमीत कमी चिरा देऊन केल्या जाणाऱ्या आधुनिक शस्त्रक्रिया पद्धतींमुळे रुग्णांना उपचाराचा अधिक चांगला परिणाम मिळत आहे. वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूर येथे करण्यात आलेली यशस्वी स्कारलेस एंडोस्कोपिक थायरॉईड सर्जरी याचे एक चांगले उदाहरण आहे. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे आजारावर प्रभावी उपचार करण्यासोबतच रुग्णाला लवकर बरे होण्यास आणि शस्त्रक्रियेनंतर सौंदर्यदृष्ट्या दिसायला चांगला परिणाम मिळण्यास मदत होते.



४५ वर्षीय महिला रुग्णाच्या मानेच्या पुढील उजव्या बाजूला हळूहळू सूज वाढत होती. डॉक्टरांनी तिची सविस्तर तपासणी केली. त्यानंतर सीटी स्कॅन आणि फाइन नीडल ॲस्पिरेशन सायटोलॉजी () यांसह आवश्यक तपासण्या करण्यात आल्या. तपासण्यांमध्ये थायरॉईडमध्ये गाठ (नोड्यूल) असल्याचे स्पष्ट झाले. रुग्णाची स्थिती लक्षात घेऊन ही गाठ मिनिमली इनवेसिव्ह म्हणजेच कमी चीरा देऊन केली जाणारी आधुनिक शस्त्रक्रिया करण्यासाठी योग्य असल्याचे आढळले.

रुग्णाला आणि तिच्या कुटुंबीयांना आजाराची माहिती, उपलब्ध उपचार पद्धती, त्यांचे फायदे आणि संभाव्य धोके याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. त्यानंतर डॉक्टरांच्या टीमने ट्रान्सओरल एंडोस्कोपिक थायरॉईडेक्टॉमी व्हेस्टिब्युलर अप्रोच () या आधुनिक पद्धतीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

ही थायरॉईडची आधुनिक शस्त्रक्रिया पद्धत आहे. यामध्ये मानेवर पारंपरिक पद्धतीने बाहेरून चिरा न देता तोंडाच्या आतील भागातून छोट्या मार्गातून शस्त्रक्रिया केली जाते. त्यामुळे मानेवर बाहेरून कोणताही शस्त्रक्रियेचा डाग राहत नाही. पारंपरिक थायरॉईड शस्त्रक्रियेनंतर मानेवर दिसणाऱ्या डागाबद्दल चिंता असलेल्या रुग्णांसाठी ही पद्धत विशेष फायदेशीर ठरू शकते. ही शस्त्रक्रिया वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूर येथील कन्सल्टंट जनरल आणि मिनिमल ॲक्सेस सर्जन डॉ. अंकुर मिश्रा यांनी यशस्वीपणे केली. शस्त्रक्रियेदरम्यान तोंडाच्या आतील बाजूने एंडोस्कोपिक पद्धतीचा वापर करून उजव्या बाजूच्या थायरॉईड ग्रंथीचा काही भाग (राइट हेमिथायरॉईडेक्टॉमी) काढण्यात आला. ही शस्त्रक्रिया मानेवर बाहेरील चिरा न देता यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली. सारख्या कमी चिरा देऊन केल्या जाणाऱ्या शस्त्रक्रियांचा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे मानेवर दिसणारा डाग टाळता येतो. यासोबतच शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णाची सुरक्षितता आणि प्रभावी उपचारांसाठी आवश्यक सर्व नियमांचे पालन केले जाते. या प्रकरणात रुग्णाला शस्त्रक्रियेनंतर खूप कमी वेदना झाल्या. तसेच शस्त्रक्रियेनंतर लवकरच तोंडावाटे आहार घेण्यास सुरुवात करता आली आणि रुग्ण लवकर चालू-फिरू लागली.

रुग्णाची रिकव्हरी कोणत्याही अडचणीशिवाय झाली. शस्त्रक्रियेनंतर ती आरामात होती आणि दुसऱ्या दिवशी तिला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. ही जलद आणि सुरळीत रिकव्हरी केवळ आधुनिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञानामुळे झाली नाही, तर शस्त्रक्रियेपूर्वी आणि शस्त्रक्रियेनंतर दिलेली योग्य काळजी तसेच हॉस्पिटलच्या टीमने केलेले सतत निरीक्षण यामध्येही महत्त्वाची भूमिका होती. या प्रकरणातून एंडोक्राइन आणि मिनिमल ॲक्सेस सर्जरीमधील आधुनिक प्रगतीमुळे रुग्णांच्या उपचारांसाठी नवीन पर्याय उपलब्ध होत असल्याचे दिसून येते. योग्य रुग्णांची निवड केल्यास स्कारलेस थायरॉईडची शस्त्रक्रिया ही पारंपरिक शस्त्रक्रियेचा एक पर्याय ठरू शकते. विशेषतः मानेवर शस्त्रक्रियेचा डाग नको असलेल्या रुग्णांसाठी हा एक चांगला पर्याय ठरू शकतो. मात्र, सुरक्षित आणि यशस्वी उपचारांसाठी रुग्णाची योग्य निवड, सविस्तर तपासणी, उपचाराबाबत योग्य समुपदेशन आणि अनुभवी तज्ज्ञांची टीम असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

या शस्त्रक्रियेच्या यशामध्ये संपूर्ण वैद्यकीय टीमचे एकत्रित प्रयत्न महत्त्वाचे ठरले. डॉ. अंकुर मिश्रा यांनी भूलतज्ज्ञांची टीम, ऑपरेशन थिएटरमधील कर्मचारी, नर्सिंग टीम आणि सहकाऱ्यांचे त्यांच्या उत्तम टीमवर्क, समर्पण आणि रुग्णाच्या उपचारातील योगदानाबद्दल कौतुक केले. वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूरमध्ये आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानासोबत डॉक्टरांचे ज्ञान आणि अनुभव यांचा योग्य वापर करून रुग्णांना सुरक्षित, प्रभावी आणि रुग्णकेंद्रित उपचार देण्यावर भर दिला जात आहे. अशा प्रकारच्या कमी चिरा देऊन केल्या जाणाऱ्या आधुनिक शस्त्रक्रियांमुळे रुग्णाची लवकर आणि आरामदायी रिकव्हरी होण्यास मदत होते. तसेच शस्त्रक्रियेनंतर दिसण्याबाबतचा आत्मविश्वास टिकवून ठेवण्यासही मदत होते.

थायरॉईडमध्ये गाठ आढळलेल्या प्रत्येक रुग्णासाठी एकच उपचार पद्धत योग्य असेल असे नाही. गाठीचे स्वरूप आणि आकार, वैद्यकीय तपासणीचे निष्कर्ष, विविध तपासण्यांचे रिपोर्ट आणि रुग्णाची एकूण प्रकृती यांसारख्या अनेक बाबींचा विचार करून उपचार ठरवला जातो. स्कारलेस शस्त्रक्रिया प्रत्येक रुग्णासाठी योग्य असेलच असे नाही. त्यामुळे सविस्तर तपासणी केल्यानंतर आणि तज्ज्ञ सर्जनसोबत चर्चा केल्यानंतरच शस्त्रक्रियेचा निर्णय घ्यावा. मेडिकल क्षेत्रात शस्त्रक्रियेचे तंत्रज्ञान सतत विकसित होत आहे. त्यामुळे उपचारांचा उद्देश केवळ आजार दूर करणे एवढाच नसून, रुग्णाने आराम, आत्मविश्वास आणि सन्मानासह पुन्हा आपल्या दैनंदिन जीवनात परतावे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. ''उपचार म्हणजे केवळ आजार दूर करणे नाही; तर रुग्णाचा आत्मविश्वास आणि जीवनाची गुणवत्ता पुन्हा मिळवून देणेही आहे.''

# सीए विद्यार्थी शेख यांच्या लक्ष्यची जागतिक विक्रमांची नोंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सीए अंतिम परीक्षार्थी तसेच वेस्टर्न इंडिया चार्टर्ड अकाउंटंट्स स्टुडंट्स असोसिएशन, अहिल्यानगरचे माजी सचिव अबुजर समीर शेख यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या लक्ष्य या ई-वार्तापत्राची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली आहे. लक्ष्यला इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाचे (आयसीएआय) पहिले आंतरराष्ट्रीय प्रकाशन तसेच पहिले संरक्षणविषयक वार्तापत्र म्हणून मान्यता मिळाली आहे. अबुजर शेख यांनी या उपक्रमाचे एकमेव निर्माते आणि मुख्य संपादक म्हणून १२ महिन्यांत १२ वेगवेगळ्या संकल्पनांवर आधारित अंक साकारले. देशभक्ती, एकरंगी रेखाचित्रे, सण-उत्सव, उद्योग, संरक्षण आणि पडल्यानंतर पुन्हा उभे राहणे अशा विविध




विषयांचा या अंकांमध्ये समावेश होता. प्रत्येक अंकातून सर्जनशीलता, सामाजिक बांधिलकी आणि विद्यार्थ्यांच्या विविधांगी कलागुणांना व्यासपीठ देण्याचा प्रयत्न करण्यात आला. लक्ष्यच्या संरक्षण विशेषांकामध्ये भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या कार्याची माहिती देणारे लेख, भारताचे माजी राष्ट्रपती व ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना समर्पित लेखमाला, निवृत्त कर्नल डी. एच. परब यांची मुलाखत तसेच संरक्षण क्षेत्र आणि सनदी लेखापाल व्यवसाय यांच्यातील संबंध यांसारख्या विषयांचा समावेश करण्यात आला. या विशेषांकाच्या निर्मितीत श्रीलंकेतील सीए विद्यार्थ्यांचाही सहभाग होता. लक्ष्य च्या या यशाबद्दल अबुजर समीर शेख म्हणाले, लक्ष्य ही केवळ एक कल्पना नव्हती, तर कल्पनांना प्रत्यक्ष रूप देण्याचा प्रयत्न होता. या प्रवासात ड. गफ्फार शेख, अभियंता आसिम शेख आणि प्रा. अरबाज पठाण यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच सीए प्रसाद पुराणिक आणि सीए अभयकुमार कटारिया यांनी माझ्या कल्पनांवर विश्वास ठेवून मला सर्जनशील स्वातंत्र्य दिले. त्यांच्या पाठिंब्यामुळे लक्ष्यला वेगळी ओळख निर्माण करता आली.

## भीषण वास्तव: पाथर्डी तालुक्यात पिके सुकू लागली; वरुण राजाच्या आशेने महागड्या खत आणि फवारणीचा खर्च सुरूच!

**दैनिक आकर्षण । सतिष जगताप**

**खरवंडी कासार–** पाथर्डी तालुक्यात यावर्षी पावसाने दडी मारल्यामुळे दुष्काळाचे संकट दिवसेंदिवस अधिकच गडद होत चालले आहे. कडक ऊन आणि दूषित वातावरणामुळे आता शेतातील उभ्या पिकांची पाने सुकू लागली आहेत. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही खचून न जाता, कदाचित आज नाही तर उद्या वरुण राजा नक्की बरसेल या एकाच आशेवर तालुक्यातील बळिराजा आजही शेतात घाम गाळताना दिसत आहे.''पत्ते खेळणाऱ्याचा डाव तरी बरा...'' शेतकरी नानासाहेब जगताप यांची आर्त व्यथातालुक्यातील शेतीची भीषण परिस्थिती मांडताना खरवंडी कासार येथील शेतकरी नानासाहेब मोहनराव जगताप यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. ते म्हणतात, ''माझ्याकडे शेतीशिवाय उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नाही. शेतात नांगरट करण्यापासून ते आज पिकांवर फवारणी करण्यापर्यंतच्या प्रत्येक कामासाठी मी पैशांची उसणवारी (उधारी) केली आहे. आता डोळ्यांदेखत पिके सुकू लागली आहेत. माणसांसह जनावरांनाही टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. अशा परिस्थितीत शेती करणे म्हणजे जीवघेणा जुगार झाला आहे. पत्ते खेळणाऱ्याचा डाव तरी बरा असतो, त्याला एका मिनिटात कळतं की डावातून उठायचं की बसायचं! पण शेतीच्या उत्पन्नासाठी आम्ही अहोरात्र काबाडकष्ट करूनही आज डोळ्यांसमोर दुष्काळजन्य परिस्थिती दिसत आहे. पुढील तीन ते चार दिवसांत जर पाऊस आला नाही, तर येथील परिस्थिती अत्यंत भयानक होईल.''दूषित वातावरण आणि फवारणीचा मार बदलत्या आणि दूषित हवामानामुळे पिकांवर विविध रोग आणि किडींचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे पिके वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना नाईलाजाने महागडी औषधे आणून फवारणी करावी लागत आहे. उत्पन्नाची कोणतीही हमी नसताना केवळ पिके जिवंत राहावीत म्हणून फवारणी आणि मशागतीचा खर्च सातत्याने सुरू आहे. शेतात खत पेरून घालणे आणि पाठीवर पंपाची टाकी घेऊन फवारणी करतानाचे विदारक पण तितकेच धडपडणारे चित्र सध्या पाथर्डी तालुक्यातील प्रत्येक शेतामध्ये स्पष्टपणे पाहायला मिळत आहे. सलाईन दिल्यासारखी पिके केवळ नावापुरतीच जिवंतपाण्याअभावी पिकांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. शेतकरी विहिरीचे किंवा उपलब्ध असेल त्या पाण्याचे हप्ते देऊन पिके कशीबशी टिकवून धरत आहेत. मात्र, हे पाणी पिकांसाठी पुरेशा अमृतात ठरत नसून, केवळ सलाईन दिल्यासारखे पिके कशीबशी जिवंत दिसत आहेत. पिकांची वाढ खुंटली असून, पावसाने लवकरच हजेरी लावली नाही, तर हा संपूर्ण खर्च वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. प्रशासनाकडून ठोस मदतीची अपेक्षा गुराढोरांच्या पाण्याचा प्रश्न, वाड्या-वस्त्यांवर सुरू असलेले टँकर, कर्जाची वाढती उसणवारी आणि आता सुकू लागलेली पिके यामुळे शेतकरी पुरता अडचणीत सापडला आहे. इतका मोठा आर्थिक जुगार खेळूनही निसर्गाची साथ मिळत नसल्याने, आता शासनाने आणि प्रशासनाने या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत व दिलासा द्यावा, अशी मागणी पाथर्डी तालुक्यातील बळिराजा करत आहे.

# ढवळगावमध्ये 'नवी दिशा' महिला ग्राम संघाची स्थापना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी –** उमेद अभियान, पंचायत समिती श्रीगोंदा अंतर्गत ढवळगाव येथे 'नवी दिशा' महिला ग्राम संघाची स्थापना उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. महिलांच्या आर्थिक, सामाजिक व संस्थात्मक सक्षमीकरणाच्या दृष्टीने ग्राम संघाची स्थापना हा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. उमेद तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती श्रीगोंदा यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. गटविकास अधिकारी राणी फराटे तसेच तालुका व्यवस्थापक श्री निलेश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम संघ स्थापनेची प्रक्रिया राबविण्यात आली. यावेळी तालुका व्यवस्थापक श्री राहुल साळवे आणि प्रभाग समन्वयक श्री दत्तात्रय राखुंडे



यांनी उपस्थित महिलांना ग्राम संघ स्थापनेचे महत्त्व व त्याचे फायदे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ग्राम संघाची रचना, ग्राम संघाची विविध कार्ये, ग्राम संघांतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या विविध समित्या तसेच ग्राम संघांना उपलब्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या निधीबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. ढवळगावातील एकूण २० महिला बचत गटांतील अध्यक्ष, सचिव व सदस्य या कार्यक्रमास उपस्थित होत्या. तसेच गावच्या माजी सरपंच अनिता वाळुंज आणि उपसरपंच मनीषा बोरगे यांचीही कार्यक्रमास उपस्थिती होती.

ग्राम संघाच्या स्थापनेनंतर त्याच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. महिलांनी एकत्रितपणे संघटित होऊन गावातील महिला बचत गटांना अधिक सक्षम करणे, महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना देणे, विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आणि महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावीपणे कार्य करणे, हा ग्राम संघ स्थापनेमागील प्रमुख उद्देश आहे. महिलांचा उत्स्फूर्त सहभाग आणि सहकार्य लाभल्याने 'नवी दिशा' महिला ग्राम संघ स्थापनेचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. या ग्राम संघाच्या माध्यमातून ढवळगावातील महिलांना विकासाच्या विविध संधी उपलब्ध होऊन महिला सक्षमीकरणाला अधिक बळ मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

(पान १ वरून)

## मेंढपाळ –पशुपालकांवरील कारवाई थांबवा

आकारणे तसेच कथित खोटे किंवा किरकोळ गुन्हे दाखल करणे, अशा तक्रारी पशुपालकांच्या प्रतिनिधींनी आपल्याकडे मांडल्या आहेत. एकीकडे चारा टंचाई, दुष्काळी परिस्थिती आणि पशुपालनाचा वाढता खर्च यामुळे हा समाज आर्थिक संकटात आहे. त्यातच अशा कारवाईमुळे हजारो कुटुंबांच्या उपजीविकेवर परिणाम होत असल्याचे लंके यांनी म्हटले आहे.

वन, पर्यावरण आणि वन्यजीव संरक्षणाला आपला पूर्ण पाठिंबा असल्याचे स्पष्ट करताना, वनसंवर्धनाच्या नावाखाली गरीब पशुपालकांच्या पारंपरिक उपजीविकेवर गदा येणे योग्य नाही, अशी भूमिका लंके यांनी मांडली. गुराखी हा गुन्हेगार नसून प्रतिकूल परिस्थितीत पशुधन सांभाळून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारा मेहनतकरी नागरिक आहे,असे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

सरकारी पडीक व गायरान जमिनीवर पशुधन चारणाऱ्या गरीब गुराख्यांविरुद्ध करण्यात येणारी कठोर कारवाई तातडीने थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. पशु चराईच्या कारणावरून दाखल झालेल्या किरकोळ अथवा कथित खोट्या प्रकरणांची निष्पक्षपणे फेरतपासणी करून योग्य ती प्रकरणे मागे घ्यावीत. तसेच पशुपालकांशी गैरवर्तन करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर विभागीय कारवाई करावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

प्रत्येक जिल्ह्यात स्पष्ट 'चराई क्षेत्र' निश्चित करून पशुपालक आणि वन विभाग यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी संतुलित व न्याय्य धोरण जाहीर करावे, अशी प्रमुख मागणी खासदार लंके यांनी केंद्रीय मंत्र्यांकडे केली आहे. वन्यजीव व वनसंपदेचे संरक्षण कायम ठेवतानाच पारंपरिक पशुपालकांच्या उपजीविकेला सुरक्षितता मिळेल, अशी व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

वनसंवर्धन आणि पशुपालकांच्या उपजीविकेचा समतोल साधणारे धोरण केंद्र व राज्य सरकारने आखावे. पशुपालकांना सुरक्षित चराई क्षेत्र उपलब्ध करून दिल्यास वनक्षेत्राचे संरक्षण आणि पशुपालकांचा उपजीविकेचा प्रश्न या दोन्ही बाबींचा समन्वय साधता येईल, असा विश्वासही लंके यांनी व्यक्त केला आहे.

## राशीन आणि कर्जतमध्ये तिरंगा रॅली

नागरिकांमुळे शहरातील वातावरण राष्ट्रभक्तीने भारावून गेले.

या रॅलीच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर तिरंगा अभिमानाने फडकवावा, तिरंग्याचा सन्मान राखावा आणि स्वातंत्र्यदिनाचा उत्सव देशभक्ती व राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेने साजरा करावा, असा संदेश देण्यात आला. 'हर घर तिरंगा' अभियान हे केवळ ध्वज फडकविण्यापुरते मर्यादित न राहता प्रत्येक नागरिकाच्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ करणारे अभियान आहे. या भावनेतून राशीन आणि कर्जत परिसरातील नागरिकांनी रॅलीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत तिरंग्याप्रती असलेला आदर आणि राष्ट्रभक्ती व्यक्त केली. भव्य तिरंगा रॅलीमुळे कर्जत तालुक्यात स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवाला उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत 'हर घर तिरंगा, हर मन तिरंगा' या भावनेचा जागर केला.

## सोशल मीडियावर आक्षेपार्ह कमेंट्स करणाऱ्यांवर तोफखान्यात दोन गुन्हे

सामाजिक सौहार्द बिघडवण्याचा प्रयत्न काही व्यक्तींनी केला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या सूचनेनुसार पोलीस अंमलदार बाळासाहेब खामकर आणि तनवीर शेख यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांत भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १९२ व ३५३(२) अंतर्गत दोन गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

## एक वर्षासाठी हद्दपार केलेला सराईत आरोपी गावठी कट्ट्यासह जेरबंद

संपण्यापूर्वीच तो जिल्ह्यात आला होता.

या प्रकरणी आरोपी सागर लोखंडे आणि फरार आरोपी गणेश भवर यांच्याविरोधात जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस कर्मचारी रोहित मिसाळ, मनोज साखरे, प्रताप देवकाते, अमोल कोतकर आणि जालिंदर साखरे यांच्या पथकाने ही कारवाई केली.